महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

विषयः-परदेशातून मद्यार्क (Ethanol AR Grade सह) आयात करुन वितरीत करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

## परिपत्रक

क्रमांक.डिवायएस.११२०१५/४१३२/२२/चार. मुंबई, २६ ऑगस्ट, २०१५.

महाराष्ट्र दारुबंदी कायदा (१९४९ चा मुंबई २५) अन्वये प्रतिबंधित केलेल्या मादक द्रव्याच्या व्याख्येमध्ये मद्यार्काचा समावेश असून असे मद्यार्क विना परवाना उत्पादीत करणे, आयात, निर्यात, खरेदी किंवा विक्री करणे तसेच वाहतूक करणे व बाळगणे हा गुन्हा आहे. अलिकडच्या काळात असे निदर्शनास आले आहे की, परदेशातून Ethenol analytical grade असे नमूद करुन व रासायनिक पदार्थ (Chemical) दर्शवून सीमा शुल्क विभागाकडून थेटरित्या या विभागाची कोणतीही अनुज्ञप्ती धारण न करता तसेच अशा मद्यार्कासाठी विहीत शुल्क व फी शासन जमा न करता ते आयात करुन वितरीत करण्यात येत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने उक्त कायद्याच्या तरतुदीचे उल्लंघन होत असल्याने संबंधीतांवर फौजदारी गुन्हे नोंद केले असून पुढील कार्यवाही चालू आहे. तथापि सर्व संबंधीत घटकांना कायदा व नियमातील तरतुदी निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने पुढील प्रमाणे सूचना प्रस्तूत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र दारुबंदी कायदा (१९४९ चा मुंबई २५) अंतर्गत मुंबई रेक्टीफाईड स्पिरीट नियम, १९५१ अंमलात आले असून सदरच्या नियमा अंतर्गत कोणत्याही व्यक्तीस रेक्टिफाईड स्पिरीट (इथेनॉलसह) किंवा मद्यार्क बाळगून त्याचा वापर करावयाचा असल्यास सदर नियमा अंतर्गत नमूद केलेल्या बोनाफाईड वापर तथा उपयोगासाठी अनुज्ञप्ती तथा परवाना प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. संबंधीत जिल्हाधिकारी अशा अनुज्ञप्ती प्रदान करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत. सदरच्या नियमात नमूद वैध प्रयोजने पुढीलप्रमाणे आहे.

१) औषधासाठी,
२) औद्योगिक वापरासाठी,
३) शैक्षणिक,
४) पॅथालॉजी,
५) शास्त्रीय व अशा इतर

विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक ........ १०८४
दिनांक ........ ५/९/१५
विभाग ........

T/७/९/१५

तत्सम कारणासाठी अनुज्ञप्ती देण्याबाबत तरतुद विहीत केली आहे. सदर नियमा अंतर्गत अनुज्ञप्ती

प्रदान झाल्यानंतर मद्यार्काशी निगडीत व्यवहार पार पाडताना पार पडावयाची प्रक्रिया विहीत केली आहे.

महाराष्ट्र दारुबंदी कायदा (१९४९ चा मुंबई २५) चे कलम ६५ अन्वये बेकायदेशीररित्या मद्यार्काची वाहतूक अथवा वापर अथवा मद्यार्काची आयात केल्यास दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा ठरत असून त्याकरिता किमान कारावास ३ वर्षे व कमाल कारावास ५ वर्षे अशी शिक्षेची तरतूद विहीत केलेली आहे. तसेच किमान रु.२५,०००/- ते कमाल रु.५०,०००/- पर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा देण्याची तरतूद आहे.

उक्त नमूद प्रयोजनाकरिता राज्यातील विविध शिक्षण संस्था, संशोधनात्मक नामांकित संस्था मद्यार्काचा वापर करीत असतात. त्यासाठी सदरच्या संस्था अनुज्ञप्ती सुध्दा धारण करतात. तथापि अनुज्ञप्ती धारण न करता अथवा विहीत मार्गाने वाहतूक परवान्यावर मद्यार्काची वाहतूक न करता मद्यार्क बाळगले अथवा मद्यार्काचा वापर केल्यास अशा संस्था विरुध्द सुध्दा उपरोक्तपणे गुन्हा नोंद करण्याची तरतूद आहे. मुंबई रेक्टिफाईड स्पिरीट व विदेशी मद्य (वाहतूक शुल्क) नियम, १९५४ च्या तरतुदी अंतर्गत पेय मद्या व्यतीरिक्त इतर कारणासाठी मद्यार्काची आयात केल्यास त्यावर प्रति ब.लि. रु. २००/- एवढे विशेष शुल्क आकारण्याची तरतूद आहे.

या नियमाच्या तरतुदी तसेच शिक्षेच्या तरतुदी या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्यात येत असून सर्व संबंधीत आयातदार तसेच मद्यार्काचा अंतिमत: वापर करणाऱ्या संस्था, औद्योगिक घटक यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी मद्यार्क बाळगण्यासाठी विहीत नमुना आरएस.२ अनुज्ञप्ती अथवा लागू असेल त्या नमुन्यात अनुज्ञप्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूर करुन घेऊन अनुज्ञप्ती अंतर्गतच मद्यार्काचे सर्व व्यवहार करावेत.

(Kumar)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी.
२. ~~सर्व~~ विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

सर्व अधीक्षकांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्था, औद्योगिक कारणासाठी मद्यार्काचा वापर करणाऱ्या संस्था, संशोधनात्मक कार्यासाठी मद्यार्क वापर करणाऱ्या संस्था, खाजगी कंपन्या यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात. तसेच आपल्या जिल्हयातून प्रसिध्द होणारे सर्व प्रमुख वृत्तपत्रे व त्यानंतर प्रसार माध्यम हे त्यासाठी पुरेशी प्रसिध्दी मिळेल याबाबत दक्षात घ्यावी.

E:\SVK\DYS.odt